मौजे लेंढरा भूखंड क्रमांक १२६१ मधील ८०० चौ.मी. जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर यांना ३३ के.व्ही. चे उपकेंद्र उभारणीसाठी हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पंदेवि १३१६/प्र. क्र.१८६/७अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ मार्च, २०१८.

वाचा :- १) कार्यकारी अभियंता, संवसु, कॉग्रेस नगर विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर यांचे पत्र क्र.काअ/कॉ.न.वि./नाग/४३६१, दि.३.१०.२०१६.
२) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे पत्र क्र.साप्रवि/जमिन/ना.उपकेंद्र/५०१/१२३२/२०१७, दि.५/१२.८.२०१७.
३) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परीषद यांचे पत्र क्र.मकृप/वि.शि.२/३१५३/२०१७, दि.२७.१२.२०१७.

शासन निर्णय :-

कार्यकारी अभियंता, संवसु, कॉग्रेस नगर विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर यांच्याकडील संदर्भ क्र.(१) येथील दि.३.१०.२०१६ च्या पत्रान्वये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या अधिपत्याखालील कृषि महाविद्यालय, नागपूर येथील मौजे लेंढरा, भूखंड क्रमांक १२६१ मधील १३०३७९.०० चौ.मी. जमिनीपैकी ८०० चौ.मी.जमिनीवर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर तर्फे ३३ के.व्ही. चे उपकेंद्र उभारणीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाकडे प्राप्त झाला. या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि. ६ मे, २०१७ रोजी संपन्न झालेल्या विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेमध्ये विषय क्र.१८/२०१७ च्या अनुषंगाने कार्यकारी परिषदेने ठराव क्र.काप/१४/२०१७ अन्वये, कृषि महाविद्यालय, नागपूर येथील मौ.लेंढरा, भुखंड क्र.१२६१ मधील १३०३७९.०० चौ.मी. जमिनी पैकी ८०० चौ.मी. जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर यांना ३३ के.व्ही. चे उपकेंद्र उभारण्यासाठी शासन मान्यतेच्या अधीन राहून हस्तांतरण करण्यास मंजूरी प्रदान करण्याबाबतचा तसेच सदर जमिनीच्या हस्तांतरणाच्या कार्यवाहीसाठी कुलगुरु यांनी अटी व शर्ती निर्धारीत करण्याबाबतचा ठराव पारित केलेला आहे.

२. याबाबतचा प्रस्ताव डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्याकडील संदर्भ क्र (२) येथील दि.५/१२.८.२०१७ च्या पत्रांन्वये महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्याकडे शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्याकडील संदर्भ क्र (३) येथील दि.८.२.२०११ च्या पत्रान्वये कृषि महाविद्यालय, नागपूर येथील मौ.लेंढरा, भुखंड क्र.१२६१ मधील १३०३७९.०० चौ.मी. जमिनी पैकी ८०० चौ.मी. जमीन विद्यापीठाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून आणि नियमानुसार मोबदला घेऊन जमीन हस्तांतरण करण्याची शिफारस शासनास केलेली आहे.

३. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम ३(३) अन्वये कृषी विद्यापीठास कोणतीही स्थावर मालमत्तेची विल्हेवाट शासनाच्या पूर्व संमतीने करता येत असल्याबाबतची तरतुद आहे.

४. डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या कार्यकारी परिषदेने दि. ६ मे, २०१७ रोजी पारित केलेला ठराव क्र.काप/१४/२०१७, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडील

संदर्भ क्र.(३) येथील दि.८.२.२०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम ३(३) मधील परंतुकामधील तरतुदी इ.बाबी लक्षात घेऊन डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या अधिपत्याखालील कृषि महाविद्यालय, नागपूर येथील मौ.लेंढरा, भुखंड क्र.१२६१ मधील १३०३७९.०० चौ.मी. जमिनी पैकी ८०० चौ.मी. जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर यांना ३३ के.व्ही. चे उपकेंद्र उभारण्यासाठी हस्तांतरण करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

अटी व शर्ती..

१) सदर जमिनीचे हस्तांतरण महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या ठरावाच्या आणि कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी निर्धारित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून असेल.

२) सदर जमिनीच्या हस्तांतरणासाठी नियमानुसार मोबदला घेण्यात यावा.

३) सदर मौजे लेंढरा, भूखंड क्रमांक १२६१ मधील १३०३७९.०० चौ.मी. जमिनीपैकी ८०० चौ.मी.क्षेत्र जमिनीचे सिमांकन (Fixation of Boundries) करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०११५०७४७०९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Devappa Annappa Gavade

Digitally signed by Devappa Annappa Gavade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6891ac4984581cb912dab1f553c065a5dd35da6c8e7cf4f22d8f94fa5f56d7, serialNumber=d00367c67d2ea5a7aecea40a3081cba4d043b40cc7b0ef510250b3ea4f9795d6, cn=Devappa Annappa Gavade
Date: 2018.03.01 15:08:50 +05'30'

(दे. आ. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल-नि-कुलपती यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
७. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
८. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. विभागीय आयुक्त, नागपूर
१०. जिल्हाधिकारी, अकोला/नागपूर
११. कार्यकारी अभियंता, संवसु कॉंग्रेसनगर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर
१२. निवड नस्ती, कार्यासन ७-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.